# राशिभविष्य - ऑगस्ट, २०१७.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==========================================================

**(१) मेष -** सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अत्यंत अस्थिर, चंचल, लहरी, अहंकारी असा झाला असण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे कोणी काही समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या तर लगेच अपमान वाटून स्वत:ला असह्य मनस्ताप करून घेत असण्याची शक्यता दिसते. असे घडत असेल तर त्यांनी विचारपूर्वक स्वत: सहनशील बनावे, मनावर संयम ठेवावा आणि नम्रतेचे आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. कारण या राशीची जी मंडळी शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत आहेत त्यांना त्यांच्या कार्यात प्रगती होण्यास व यश येण्यास काळ अनुकुल आहे. या राशीच्या लहान मुलांकडे त्यांच्या पालकांनी विशेष लक्ष द्यावे. नपेक्षा त्यांचा हूडपणा, वात्रटपणा अनर्थ घडवील. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला शुक्र ग्रह विविध प्रकारे लाभदायक होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक सुखाचे दृष्टीने काळ प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे कुटुंबात वाद, भांडणे होणे संभवते. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे संभवते. त्यामुळे असह्य मनस्ताप होऊन शारीरिक अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाची आचरणविषयक समस्या अशापैकी कारणानी अपेक्षित संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. वरिष्ठ अधिकाऱ्याची अवकृपा होणे संभवते. विचाराच्या तंद्रीत चालू नका, वाहने चालवू नका. अपघात भय संभवते. जपा. कुमार्गी मित्र वा सहकारी यांच्यापासून दूर राहा. बौद्धिक व कलात्मक व्यापार-व्यवसाय, दलाली, कमिशनवर व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे " ओम गं गणपतये नम:" मंत्राचा जप करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात अनुकुल/प्रतिकुल असे संमिश्र स्वरूपाचे अनुभव येण्याची दाट शक्यता आहे. नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार आहे. त्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळींनी जे काय साध्य करावयाचे आहे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. हातची संधी दवडलीत तर नंतर पश्चात्ताप करण्याची पाळी येईल. महिन्याचा उत्तरार्ध पूर्णपणे प्रतिकुल होणे संभवते. तसेच कौटुंबिक सुखाचे दृष्टीने सुद्धा महिन्याचा पूर्वार्धच सुखाचा जाईल. रवि-मंगळ हे उष्ण प्रकृतीचे ग्रह या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर विविध करणानी कुटुंबात असमाधानकारक घटना घडणे संभवते. त्यामुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. काही मंडळींना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; तर काहींना स्थावरसंबंधीची समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. काही मंडळींना आरोग्यविषयक समस्या त्रस्त करील. राहूमुळे आप्तेष्टात वाद, भांडणे होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या वक्री हर्षलमुळे काही मंडळींना आर्थिक समस्या त्रस्त करतील; तर काहींना वाईट प्रसंगाशी मुकाबला करावा लागेलसे दिसते. शिवाय अकारण शत्रुत्व निर्माण होणेही शक्य दिसते. जपा. या राशीच्या युवकांना हातचे सोडून नवे काही करण्याची उर्मी येईल. पण त्यांनी मनावर संयम ठेवून आहे ती नोकरीच करावी. मानसिक आजार तज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना काही प्रमाणात संपूर्ण महिन्याचा

काळ अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळीना स्वत:च्या किवा जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील व त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. काहींना कुसंगतीची बाधा होणेही शक्य आहे. जपा. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. संततिसुख लाभेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना व हनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती लाभेल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल व लाभदायक होईल. पण त्यासाठी महिन्याच्या पूर्वार्धात घडणाऱ्या व असह्य मनस्ताप देणाऱ्या घटनांमुळे निराश न होता मनावर संयम ठेवून व सहनशील बनून शारीरिक आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. कारण महिन्याच्या पूर्वार्धात रवि-मंगळ दोन्ही उष्ण प्रकृतीचे अहंकारी ग्रह तसेच वातविकारांचा शनी ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. त्यांच्यामुळे कौटुंबिक जीवनात मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचा आजार होणे संभवते. काही मंडळींना डोळ्याचे दुखणे त्रस्त करील तर काहींना घसा, दाढा, मानेच्या दुखण्याचा आजार त्रस्त करील. जपा. त्याचप्रमाणे वाढत्या खर्चाची चिंता, अनपेक्षित येणाऱ्या खर्चाची जबाबदारी, येणे असलेल्या धनाबाबत अनिश्चितता अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. जपा. आरोग्यस्थानी शत्रुराशीत असलेला शनि ग्रह असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडविण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात रवि-मंगळ अनुकुल होतील व नोकरी-व्यवसायात मनोनुकुल घटना घडतील. पण सतत सावधानतेने आचरण करा. शारीरिक दुखापत होणे संभवते. राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; पण नातेसंबंधातील कोणाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. काही भाग्यवान मंडळी स्थावर खरेदी करू शकतील; तर काहीना असलेली स्थावर मनाप्रमाणे विकणे शक्य होईल. या राशीच्या काही मंडळींकडून " वरून कीर्तन, आतून तमाशा " असे ढोंगी आचरण होण्याची शक्यता आहे. त्यांनी तसे करू नये. ते घातकच आहे. जपा. अध्यात्मात रस असेल तर उपासनेद्वारे मन:शक्ती व मन:शांती मिळू शकेल. मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते. जपा. शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना या संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. जीवनाच्या सर्वच अंगांनी विचार करता असे दिसते की एकूण ग्रहस्थिती शारीरिक-मानसिक आरोग्य विघातक असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना अपार कष्ट-परिश्रम करूनच आर्थिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा लागेल. पण अशा प्रयत्नांना फारसे यश मिळण्याची शक्यता कमीच आहे. श्रम, दगदगीमुळे व आर्थिक चिंतांमुळे शारीरिक मानसिक अनारोग्य होणे संभवते. जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी प्रयत्नपूर्वक मन व विचारशक्ती शांत राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि सतत मनावर संयम ठेवून व सहनशील बनून प्रतिकुल काळ व्यतीत केला पाहिजे. तरच आरोग्य फारसे बिघडणार नाही; व शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने ज्या मनोनुकुल घटना घडतील त्यांचे सुखसमाधान लाभेल. उष्णताविकार बळावतील. त्यामुळे काही मंडळीना नेत्रविकाराचा आजार त्रस्त करील;

तर काहींना घसा, दाढा, मान यांच्या आजाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा.

केवळ बौद्धिक -शैक्षणिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना काळ काही प्रमाणात अनुकुल होणे संभवते. पण भावंडाकडून मनस्ताप होणे संभवते. स्वभावदोषामुळे कौटुंबिक जीवनात वाद, भांडण तंटे होणे संभवते.. जपा. शनि ग्रहामुळे मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाची आचरणविषयक समस्या अशापैकी कारणानी अपेक्षित संततिसुख लाभण्याची शक्यता दिसत नाही. तसेच वैवाहिक जीवनातही जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील मतभेद, वाद अशापैकी कारणानी वैवाहिक सुख लाभण्याची शक्यता दिसत नाही. पाण्यापासून धोका आहे. जपा. तसेच विषभय असल्याने उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(५) सिंह -** जीवनसाथीचे अनारोग्य, तुमची स्वत:ची अस्वस्थ मनस्थिती अशापैकी कारणांनी या राशीच्या मंडळींना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळण्यात अडथळे निर्माण होतील. जपा. ज्यांची काही प्रकरणे न्यायालयीन निकालाशी संबंधित असतील त्यांनाही त्यात अपयश येणे संभवते.

निराशेपोटी काहींना वैराग्य येणेही शक्य आहे. रवि-मंगळ व शनि हे तीनही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे विविध कारणांनी सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. कोणाची काही दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. काहींना मानहानी सहन करावी लागेल. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असतील त्यांनी तर मनावर सतत संयम ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण करावे. तेच सुखाचे होईल व होणारा मनस्ताप सुसह्य होईल. आपल्या अधिकारशाही, अहंकारी स्वभावाला नियंत्रित ठेवा. नपेक्षा अकारण श्रम, दगदग होईल व त्यामुळे अनारोग्य होणे संभवते. जपा. शारीरिक उष्णता भडकून नेत्रविकार, घसाविकार, मान, दाढा दुखणे अशापैकी कशाचा तरी आजार त्रस्त करील. आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वक करा. कारण आर्थिक फसवणूक होणे संभवते. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. केवळ शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. गुरु-शुक्र हे शुभ ग्रह अनुकुल असल्याने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काहींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. बौद्धिक व कलाक्षेत्रातील मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना मन:शांती देईल. तसेच हनुमान उपासनाही करा. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना सध्या काल्पनिक चिंता त्रस्त करत असण्याची शक्यता जाणवते. काहींना आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. पण त्यांनी तसे समजू नये. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने आरोग्य उत्तम राहील. या राशीच्या शासकीय व निम-शासकीय नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही भाग्यवान मंडळींना तर महिन्याच्या पूर्वार्धात मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही शक्य आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि-मंगळ-बुध हे तीनही ग्रह प्रतिकुल होणार असल्याने

सतत असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहण्याची शक्यता आहे. जपा. ज्यांची काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर त्यांचा पुन्हा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. सतत भांडण तंटे होणे संभवते. अशा परिस्थितीत सतत मनावर संयम ठेवून व सहनशील बनून मौन व्रत धारण करणेच सुखाचे होईल. त्यामुळे होणारा मनस्ताप सुसह्य होईल. व्ययस्थानी असलेला राहू काहींना धनलाभ तर काहींना परदेशगमनाची संधी देईल. शनि ग्रहामुळे
काहीना उत्तम नोकरी तर काहींना आवडते कार्यक्षेत्र प्राप्त होईल. पण हाच शनि एखादी भावंडविषयक चिंता निर्माण करण्याची शक्यता आहे. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण कला क्षेत्रातील मंडळींना काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. काहीही कारणाने मित्रांशी भांडणे , वितुष्ट निर्माण होणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या वक्री हर्षलमुळे अपघातभय आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. 'बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे व हनुमानचालिसा स्तोत्राचे दररोज नियमितपणे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय भावनाशील झाली असण्याची शक्यता जाणवते. तसेच या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना, यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना, औषध विक्रेत्यांना, वैद्यकीय व्यवसाय असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या काही मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. काही मंडळींना नवे मित्र मिळणे किंवा धनलाभ होणे संभवते. काहींना कीर्ती-प्रसिद्धी मिळणेही शक्य आहे; तर काहींना गुरुकृपा प्राप्त होईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. पण पंचम स्थानी असलेल्या केतू मुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. विविध कारणांनी या राशीच्या मंडळींना अपेक्षित संततिसुख मिळणे संभवत नाही. धनस्थानी असलेल्या वक्री शनिमुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. तसेच आर्थिक समस्या त्रस्त करतील. काही मंडळींना कोर्ट प्रकरणाचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. सप्तम स्थानी असलेल्या वक्री हर्षलमुळे जीवनसाथीच्या लहरी, विक्षिप्त आचरणामुळे तसेच दोघांतील वाद, मतभेद यांमुळे वैवाहिक जीवनातील अपेक्षित सुखसमाधान मिळण्यात बाधा येणे संभवते. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांच्या भागीदारीत विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. व्यय स्थानी असलेल्या गुरुमुळे प्रयोगाचे योग येतील. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना अनुकुल होईल व त्यामुळे होणारा असह्य मनस्ताप सुसह्य होईल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ मनस्ताप देणारा व आरोग्यविषयक चिंता निर्माण करणारा असल्याचाच अनुभव येणे संभवते. त्यात आपली मनस्थिती चंचल, अस्थिर झाली असेल तर अधिकच मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. प्रतिकुल काळ व्यतीत करण्यासाठी मन शांत व स्थिर ठेवा. सहनशील वृत्ती अंगी बाणवा. कधीही "अरे"ला "कारे" करू नका. समोरच्याचा अपमान होईल असे बोलू नका. त्यामुळे तुम्हालाच असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. वक्री शनीमुळे नियोजित कार्यात अडथळे, अडचणी

निर्माण होणे संभवते. काही मंडळींना घरातील प्रिय जन सोडून परगावी जावे लागण्याची दाट शक्यता आहे. या स्थलांतर योगामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. काहींना नैराश्य येणेही शक्य आहे. जपा. स्वत:च्या व जीवनसाथीच्या आरोग्यविषयक समस्या त्रस्त करतील. कोणी काही उपदेशपर बोलले तर ते पटणार नाही व संताप येईल. जपा. त्यामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्ध विरोध, मानहानी, कामाचा ताण सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. पण महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल व लाभदायक होईल. मोठ्या लोकांच्या ओळखी होतील. त्यांच्या मदतीने काही मनोनुकुल असे घडू शकेल. शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या हर्षलमुळे चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणाराना प्रगती करून अपेक्षित यश मिळविणे शक्य होईल. पण हाच वक्री हर्षल अति विचाराने डोकेदुखीचा आजार निर्माण करीलसे दिसते. काही मंडळींना मुदतीचा ताप येणे, तर काहींना मेंदू विकार त्रस्त करतील. अशा प्रतिकुल परिस्थितीत शुभ ग्रह गुरु-शुक्र यांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील. .श्रद्धेने श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ शारीरिक-मानसिक आरोग्याच्या दृष्टीने प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. सध्या या राशीच्या मंडळीची मनस्थिती अत्यंत भावनाप्रधान झाली असण्याची शक्यता दिसते. त्यात सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी निराश न होता सतत सावधानतेने आचरण करणेच सुखाचे होईल. विशेष करून सर्व आर्थिक व्यवहार जपून, विचारपूर्वक व सावधानतेने करणे आवश्यक होईल. अध्यात्मासाठी काळ अनुकुल असल्यामुळे त्यांनी आध्यात्मिक उपासनेत व्यग्र व्हावे. त्यामुळे मन:शक्ती प्राप्त होईल व प्रतिकुल काळाशी मुकाबला करणे शक्य होईल. एकूण ग्रहस्थिती प्रतिकुल असल्यामुळे अनपेक्षित संकटांना तोंड द्यावे लागेलसे दिसते. काही मंडळींना कोर्ट प्रकरणांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. त्याचा शारीरिक आरोग्यावर परिणाम होईल. जपा. काहींना उष्णता विकार त्रस्त करतील. मूळव्याधी सारखा आजार त्रस्त करील. हाडमोड होणेही संभवते. काहींना जल-वीज यांपासून धोका आहे. जपा. कौटुंबिक जीवनात जीवनसाथीचे अनारोग्य, संतति समस्या त्रस्त करतील. त्यामुळे काहीजणांच्या मनावरील ताबा सुटून भावनेच्या भरात भरकटत जाण्याची शक्यताही आहे. जपा. गुरु-हर्षल हे ग्रह अनुकुल असल्याने उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना त्याच्या कार्यात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल . काहींना नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यताही दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप होणे संभवते. आपली गुरु ग्रहाच्या मालकीची राशी असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करावी. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करावे. त्यामुळे मन:शांती मिळेल.

**(१०) मकर -** सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव विविध कारणांनी अस्वस्थ, संतप्त, चंचल, तक्रारखोर असा झाला असावा, असे वाटते. तसे असेल तर त्यांचे कोणाशीही पटत नसावे. आहे त्या परिस्थितीत सुख समाधान लाभत नसावे. त्यामुळे गृहसौख्यही मिळत नसेल, असे वाटते. या अस्वस्थतेचे मुख्य कारण आर्थिक समस्या हेच असावे, असे वाटते. शिवाय गैरसमजूत,

घरगुतीबाबत घोटाळे अशापैकी कारणांनी सुद्धा मनस्थिती अस्वस्थ होणे शक्य दिसते. या राशीच्या मंडळींना नोकरीत महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात मनासारखे काहीच घडणार नाही, असे वाटते. पण बौद्धिक कार्यक्षेत्र व कलात्मक कार्यक्षेत्र असेल तर महिन्याचा पूर्वार्ध खूपच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होणार असल्यामुळे पतिपत्नीत काहीही कारणाने वाद भांडणे होणे संभवते. तसेच जीवनसाथीच्या अनारोग्यामुळेही वैवाहिक जीवनात सुखसमाधान लाभणार नाही. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी कोणत्याही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरण असेल तर अपयश येणे संभवते. वक्री शनि व राहूमुळे मुलांपैकी कोणाचे आजारपण कोणाची आचरणविषयक समस्या अशापैकी कारणानी अपेक्षित संततिसुख लाभणेही शक्य दिसत नाही. भाग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे अपेक्षित संधी प्राप्त होण्याची शक्यता आहे. तसेच अध्यात्माची आवड असणारांना उपासनेद्वारे अध्यात्म प्रगती साधणे शक्य होईल. काही मंडळींना प्रसिद्धी मिळणेही संभवते. तसेच प्रवासाचे योगही संभवतात. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती मिळेल. दररोज नियमितपणे “हनुमान चालीसा" स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय कोमल झाली असल्याचे जाणवते. तसे असेल तर मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असाव्यात असे वाटते. त्यामुळे थोडे मनाविरुद्ध काहीही घडले तर लगेच गहरे नैराश्य येत असावे.. त्यामुळे काही करू नये असे वाटून उदास उदास वाटत असण्याची शक्यताही जाणवते. याचे कारण म्हणजे आर्थिक समस्या त्रस्त करत असावी, असे वाटते. तसेच कौटुंबिक वाद, भांडणे यांची भर पडून अस्वस्थ होत असाल, असे वाटते. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल होईल. शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना, वैद्यकीय व्यवसाय, केमिस्ट, यांना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल वा लाभदायक होईल. कोळसा, लोखंडी सामान विक्रेत्यांना संपूर्ण महिन्याचा काळ मनस्तापदायकच होणे संभवते. शिवाय शारीरिक -मानसिक अनारोग्य त्रस्त करीलसे दिसते. काहींना पोटविकार तर काहींना हाडाची दुखणी त्रस्त करतील, असे वाटते. काही मंडळीना रक्तविकार, हृदय विकार यांचा त्रास असणेही संभवते. काही मंडळींना अपप्रचाराचा तर काहींना चोरीमुळे किंवा आर्थिक नुकसानीमुळे मानसिक त्रास सहन करावा लागेलसे दिसते. सप्तम स्थानी असलेल्या राहू-मंगळामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. अष्टम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे जन्मकुंडलीत योग असेल तर या राशीच्या काही मंडळीना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने अचानक धनलाभ होणे संभवते. . पण गुरु-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. कलात्मक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या बऱ्याच मंडळींचा स्वभाव लहरी, चंचल व अस्थिर झाला असावा, असे जाणवते. त्यामुळे अविचाराने विचित्र आचरण होणेही संभवते. मन व बुद्धीवर ताबा नसल्यास अकारण आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्यांची मने दुखावली जातील. जपा. हे सर्व काल्पनिक चिंता व मानसिक व्यग्रता व घरीदारी घडणाऱ्या, मनस्ताप देणाऱ्या घटनांमुळे होत

असावे, असे वाटते. म्हणून सांगावेसे वाटते की मन शांत ठेवा, काल्पनिक चिंता करू नका व सतत मनावर संयम ठेवून व सहनशील बनून व जिभेला लगाम घालून प्रतिकुल काळ व्यतीत करा. तेच सुखाचे होईल.

विशेष करून मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाचे विचित्र आचरण, प्रिय जनांपासून झालेला दुरावा, नोकरीत वरिष्ठांचा त्रास अशापैकी कारणांनी घडत असावे, असे वाटते. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक नोकरी व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असणारांना अशा संबंधामुळे लाभ होण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात अनारोग्याचा त्रास होणेही संभवते. ताप येणे, उष्णतेने अंगावर फोड येणे, दुखापत होणे, रक्तविकार, हृदयविकार बळावणे, अपप्रचाराचा त्रास होणे, चोरी होणे, आर्थिक नुकसान होणे, अशापैकी काही कारणांनी स्वस्थता लाभणे अशक्य होईल. जपा. अशा प्रतिकुल परिस्थितीतही गुरु-शुक्र या शुभ गहांच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक जीवनात मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. विवाहेच्छूचे विवाह ठरतील, प्रेमसंबंध वाढतील, नवे स्नेहसंबंध जुळतील. काहींना प्रवासाचे योग येणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====